दि. ०६/०८/२०२६

## प्रेस नोट

### पवित्र प्रणालीमार्फत शिक्षण सेवक/शिक्षक पदभरती सन २०२५
### प्राधान्यक्रम नोंद करण्याबाबत

- महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षण सेवक/शिक्षक पदभरतीसाठी "शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५" चे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते.

- सदर ऑनलाईन चाचणी दिनांक २७/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ या कालावधीमध्ये घेण्यात आली. या चाचणीसाठी एकूण **२,२८,८०८** उमेदवारांनी नोंदणी केली होती, त्यापैकी **२,११,३०८** उमेदवार चाचणीस प्रविष्ट झाले. स्व प्रमाणपत्र पूर्ण केलेले **१,७०,१०८** आहेत.

- **"शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५"** मधील प्राप्त गुणांच्या आधारे राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांतील इयता १ ली ते १२ वीकरिता शिक्षण सेवक/शिक्षक या रिक्त पदांची भरती करण्यात येत आहे. सदर भरती ही त्या त्या व्यवस्थापनामध्ये रिक्त असलेली पदे व त्यासाठीचे शिल्लक आरक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन **८० टक्के** पदांसाठी करण्याचे शासनादेशानुसार नियोजित आहे.

- पवित्र पोर्टलवर जाहिरातीची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर जिल्हा परिषदांच्या-**१३,३५२** मनपाच्या-**१,९५४**, नगर पालिका/परिषदाच्या-**२८०** व खाजगी शैक्षणिक संस्थांच्या-**१२,१४८** अशा एकूण **३०,२०९** रिक्त पदांच्या भरतीची मागणी नोंदविण्यात आली आहे.

- **पवित्र पोर्टलवर व्यवस्थापननिहाय प्राप्त जाहिरातीतील रिक्त पदांचा तपशील :**

| अ क्र | व्यवस्थापन | मुलाखतीशिवाय पदसंख्या | मुलाखतीसह पदसंख्या | जाहिरातीतील एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | १३,३५१ | -- | १३,३५१ |
| २ | नगर पालिका/परिषदा | २८० | -- | २८० |
| ३ | महागरपालिका | १,९५४ | -- | १,९५४ |
| ४ | आदिवासी विकास विभाग शासकीय शाळा | २,४२१ | -- | २,४२१ |
| ५ | शासकीय विद्यानिकेतन | ५६ | -- | ५६ |
| ६ | खाजगी शैक्षणिक संस्था | १,८१९ | १०,३२८ | १२,१४८ |
| | **एकूण** | **१९,८८१** | **१०,३२८** | **३०,२०९** |

- पदनिहाय निहाय प्राप्त जाहिरातीतील रिक्त पदांचा तपशील :

| अ क्र | पद प्रकार | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | इयत्ता १ ली ते ५ वी | १४,३२० |
| २ | इयत्ता ६ वी ते ८ वी | १०,०१२ |
| ३ | इयत्ता ९ वी ते १० वी | ५,५१३ |
| ४ | इयत्ता ११ वी ते १२ वी | ३६४ |
| | एकूण | ३०,२०९ |

- पदभरतीबाबत उमेदवारांना पोर्टलवर प्राधान्यक्रम नमूद करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आलेले आहे. तसेच उमेदवारांना SMS द्वारेदेखील कळविण्यात येत आहे.

- उमेदवारांनी लॉगिन करण्यासाठी https://tait२०२५.mahateacherrecruitment.org.in या संकेत स्थळावर भेट देऊन प्राधान्यक्रम जनरेट करून घ्यावेत. त्यानंतर पदनिहाय पसंतीक्रम नमूद करण्याची सुविधा दिनांक ०६/०८/२०२६ रोजी दिली आहे.

- उमेदवारांनी पदनिहाय पसंतीक्रम नमूद करून दिनांक ०६/०८/२०२६ ते ११/०८/२०२६ पर्यंत दिलेल्या मुदतीत लॉक करणे आवश्यक आहे.

- पदभरतीसाठी उमेदवारांची प्राधान्यक्रमाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीशिवाय या प्रकारातील गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

- पदभरतीबाबत उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की पवित्र पोर्टलवरील पदभरतीशी संबंधित आपले म्हणणे/मागणी इ.बाबी edupavitra25@gmail.com या ईमेलवर पाठवाव्यात, जेणेकरून त्याची योग्य ती दखल घेतली जाईल.

--****--